K.R. Sonawane गोरे
मूळ

सत्यमेव जयते

Form VI
[See rule 25 (1) ]

GOVERNMENT OF MAHARASHTRA
OFFICE OF LICENSING OFFICER THANE

Licence No.- **1610200110015255**

**Dated** - 17/11/2016

**Fee Paid Rs.** 80023.00

## Licence

LICENCE is hereby granted to **K R SONAVANE AND SONS 11 JYOTI KUNJ B WING, BAKERY GALI, NEAR ICE FACTORY, BHAYENDER, THANE, THANE, MAHARASHTRA, 40101** under Section 12 (2) of the Contract Labour (Regulation and Abolition) Act, 1970 in respect of the registered establishment No.126122015200000005106

**Name** - **K R SONAVANE AND SONS**

**Address** - MBMC, BHAYENDER, SBI, BHIWANDI, THANE, MAHARASHTRA, 40101

of which **MIRA BHAYENDER MUNCIPAL CORPORATION** is the Principal Employer subject to the condition specified in Annexure.

The Licence shall remain in force till **30/04/2017**

Signature valid
Digitally Signed By Shailendra Balawant Pol
(Commissioner Of Labour)
Date : 17-Nov-2016 14:31:25 IST

Signature of Licensing Officer.
Under Contract Labour (R & A) Act,1970

Date :17/11/2016

ii) The number of workmen employed as contract labour in the establishment shall not, on any day, exceed 150.00 ONE HUNDRED FIFTY

iii) Except as provided in the rules, the fees paid for the grant, or as the case may be, for renewal of the licence shall be non-refundable.

iv) a) The rates of wages payable to the workmen by the contractor shall not be less than the minimum rates of wages fixed under the Minimum Wages Act, where that Act applies, where the rates have been fixed by agreement, settlement or award, shall not be less than the rates so fixed and where rates have been fixed under the Minimum Wages Act and under any agreement, settlement or award the rates shall not be less than the higher of the two rates.

b) Where the workmen employed by the contractor perform the same kind of work as the workmen or a class of workmen directly employed by the principal employer, the rates of wages payable to the workmen by the contractor shall be the rates payable to the workmen directly employed by the principal employer doing the same kind of work.

c) In any other case, the rates of wages shall be such as may be specified in this behalf by the Commissioner of Labour.

(v) a) The hours of work and other conditions of service of the workmen of the contractor shall be in accordance with the provisions of the Minimum Wages Act, where that Act applies and where any agreement, settlement or award is in force, in accordance with the provisions of the said agreement, settlement or award; and where in any employment the Minimum Wages Act applies and there is also in force any agreement, settlement or award, the conditions of service shall be governed by provisions which are more beneficial to the workmen.

b) In other cases where the workmen employed by the contractor perform the same kind of work as the workmen directly employed by the principal employer of the establishment, the hours of work and other conditions of service of the workmen of the contractor shall be the same as applicable to the workmen directly employed by the principal employer of the establishment.

c) In case not falling under sub-clause (a) or (b) the hours of work and other conditions of service of the workmen of the contractor shall be such as may be specified by the Commissioner of Labour.

Explanation - While determining the wages, hours of work and other conditions of service under sub-clause (c) of clause (iv) and sub-clause (c) of clause (v), the Commissioner of Labour shall have due regard to the wages, hours of work and other condition of service obtained in similar employments.

(vi) a) In every establishment, where twenty or more women are ordinarily employed as contract labour there shall be provided and maintained by the contractor a room or rooms for the use of children under the age of six years as may be required by the Commissioner of Labour and the standard of construction, scale of accommodation and the facilities shall be such as may be specified by the Commissioner of Labour:

Provided that, where the principal employer is required under the Factories Act and the Rules thereunder to provide and maintain a creche or other alternative arrangements for the use of children of women employees directly employed by him any arrangements made by the contractor with the principal employers for the use of the creche (or other alternative arrangements in lieu of creche) by the children under the age of six years of the female workmen employed by the contractor, shall be considered as the compliance of the provisions of this clause:

Provided further that, such arrangements are according to the standard prescribed in the Factories Act and the Rules framed thereunder.

b) In other cases, there shall be provided and maintained a room or rooms for the use of children under the age of six years, as may be specified by the Commissioner of Labour.

vii) The contractor shall provide other essential amenities for contract labour employed in accordance with the Maharashtra Contract Labour (Regulation and Abolition) Rules, 1971.

viii) The licensee shall notify any change in the number of workmen or the conditions of work to the licensing officer.

"बालकामगार कामावर ठेवणे गुन्हा आहे"

दूरध्वनी: २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स: २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१.

जा. नं. मनपा/परिवहन/१३६/२०१५-१६ दिनांक : ०८/११/२०१५

## ।। कार्यादेश ।।

प्रति,

मे.के.आर.सोनावणे अॅन्ड सन्स,
एफ/१२०, सेक्टर - ४,
ऐरोली, नवी मुंबई.

विषयः- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी ठेका पध्दतीने HPMV बस बॅचधारक वाहनचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणेबाबत.

संदर्भः- १) दि.२०/०८/२०१४ रोजीचा करारनामा.
२) दि.२५/०८/२०१४ रोजीचा कार्यादेश.
३) आपले दि.२०/१०/२०१५ रोजीचे पत्र.
४) मनपा/परि/१२३/२०१५-१६ दि.२३/१०/२०१५ रोजीचा कार्यादेश.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेसाठी संदर्भ क्र.२ अन्वये आपणास वार्षिक कार्यादेश देणेत आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वतः परिवहन सेवा दि.२४/१०/२०१५ रोजी पासून सुरु केलेली असुन याकामी महानगरपालिकेस HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक आपलेकडून संदर्भिय क्र.४ च्या कार्यादेशान्वये पुरवठा करणेत आलेला आहे. दि.०९/११/२०१५ रोजी पासून वाढीव ११ बसेस मार्गस्थ करावयाच्या असल्याने संदर्भिय क्र.३ अन्वये मंजूर केलेल्या दरानुसार संदर्भिय क्र.४ च्या परिवहन कार्यादेशासह एकूण ४४ HPMV बस बॅचधारक बसचालक, ४४ बसवाहक, १६ तिकिट तपासनीस व १५ प्रवर्तक यांचा परिवहन विभागात पुरवठा करणेत यावा.

(कल्पिता पिंपळे)
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

दूरध्वनी: २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स: २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१.

जा. नं. मनपा/परिवहन/७२६/२०१५-१६

दिनांक : 23/10/2015

।। कार्यादेश ।।

प्रति,

मे.के.आर.सोनावणे ॲन्ड सन्स,
एफ/१२०, सेक्टर - ४,
ऐरोली, नवी मुंबई.

विषयः- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागासाठी ठेका पध्दतीने HPMV बस बॅचधारक वाहनचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणेबाबत.

संदर्भः- १) दि.२०/०८/२०१४ रोजीचा करारनामा.
२) दि.२५/०८/२०१४ रोजीचा कार्यादेश.
३) आपले दि.२०/१०/२०१५ रोजीचे पत्र.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेसाठी संदर्भ क्र.२ अन्वये आपणास वार्षिक कार्यादेश देणेत आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वतः परिवहन सेवा चालविणेचा निर्णय घेतलेला असून याकामी महानगरपालिकेस HPMV बस बॅचधारक, बसचालकांची, बसवाहकांची, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांची आवश्यकता आहे. संदर्भ क्र.३ अन्वये आपण सादर केलेले दर मंजूर करणेत येत असून ठेका पध्दतीने दि.२५/१०/२०१५ पासून परिवहन विभागाकरिता २० HPMV बस बॅचधारक बसचालक, २० बसवाहक, ६ तिकिट तपासनीस व ४ प्रवर्तक यांचा परिवहन विभागात पुरवठा करणेत यावा.

तसेच यापुढेही परिवहन विभागाच्या आवश्यकतेनुसार व त्यांच्या मागणीनुसार ठेका पध्दतीने बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांचा पुरवठा करणेत यावा.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रतः- माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव,
१) परिवहन व्यवस्थापक

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती सभा दि.३०/११/२०१५

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" कलम ... अन्वये ...)

**प्रकरण क्र. :- ९९४ परिवहन उपक्रमास JnNURM-II योजने अंतर्गत प्राप्त बसेस चालविणेसाठी कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत व त्या अनुषंगाने लागणाऱ्या अंदाजपत्रकीय तरतूदीस मान्यता मिळणेबाबत.**

**ठराव क्र.:- ९०९**

मिरा भाईंदर परिवहन उपक्रमा अंतर्गत जे.एन.एन.यु.आर.एम. या योजने अंतर्गत प्राप्त बसेस चालविणेसाठी ऑक्टोबर २०१० पासून निविदा प्रक्रिया करुन रॉयल्टी तत्वावर मे.केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना ठेका देण्यात आलेला आहे. सन २०१२ पासून ठेकेदार फक्त ५० बसेस चालवित आहे. मे २०१५ पर्यंत ३८ बसेस मार्गस्थ होत्या, परंतु सद्यस्थितीत फक्त १५ ते २० बसेस मार्गस्थ आहेत. याबाबत मे.केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना वेळोवेळी लेखी तसेच दुरध्वनी द्वारे बंद पडलेल्या बसेसची दुरुस्ती करुन जादा बसेस चालविणे बाबत निर्देश दिले असुन ठेकेदाराने आजपर्यंत सुस्थितीतील बसेस मार्गस्थ केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांचे मुख्यत्वे करुन भाईंदर (प.) ते उत्तन, मोर्वा खाडी, मनोरी तळ या मार्गावरील प्रवाशांचे हाल होत आहे. याबाबत प्रवासी संघटना, विविध पदाधिकारी, गटनेते यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. तसेच नागरी हक्क संघर्ष समिती व जन-मोर्चा, उत्तन यांनी काळे झेंडे लावून निर्दशनेही केलेली आहेत. त्यामुळे त्या परिसरातील नागरिकांच्या रोषाला तसेच नाराजीला प्रशासनाला सामोरे जावे लागत आहे. परिणामी कायदा आणि सुव्यवस्था बिघडण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमास JnNURM-II या योजने अंतर्गत मंजूर झालेल्या बसेस पैकी २५ बसेस स्वतः चालविण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतलेला असुन त्यानुसार निविदा प्रक्रिया ही प्रस्तावित केली आहे.

मा.मुख्यमंत्री यांचे हस्ते दि.२४/१०/२०१५ रोजी बससेवेचा लोकार्पण सोहळा संपन्न झालेला असुन दि.२५/१०/२०१५ पासून तातडीने बससेवा सुरु करणे आवश्यक आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या हलक्या व जड वाहनांसाठी ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी मंजूर ठेकेदार मे.के.आर.सोनावणे ॲन्ड सन्स या मंजूर ठेकेदाराकडून HPMV बस बॅचधारक व आर.टी.ओ. कडील लायसन्सप्राप्त बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक उपलब्ध करुन घेणेसाठी मे.के.आर.सोनावणे ॲन्ड सन्स यांना दि.१९/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये वरील बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांचे दर मागविले असता

सत्य प्रत

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मे.के.आर.सोनावणे ॲन्ड सन्स त्यांच्या दि.२०/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे दर सादर केले असुन सदर ठेकेदारा समवेत वाटाघाटी केलेनंतरचे दरही सादर केलेले आहेत.

| अनु क्र. | तपशिल | वाटाघाटी पुर्वी सादर केलेले दर | | वाटाघाटी अंती सादर केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | दर (प्रति दिन) | दर (प्रति महिना) | दर (प्रति दिन) | दर (प्रति महिना) |
| १) | बसचालक<br>(HPMV बस बॅचधारक,<br>आर.टी.ओ.कडील लायसन्स प्राप्त) | रु.५९३/- | रु.१७,७८६/- | रु.५६९/- | रु.१७,०७०/- |
| २) | बसवाहक<br>(बस बॅचधारक व कमीत कमी<br>३ वर्षे अनुभव) | रु.५२६/- | रु.१५,७८६/- | रु.५०३/- | रु.१५,०९०/- |
| ३) | तिकिट तपासनीस<br>(१२ वी उत्तीर्ण व तिकिट तपासनीस<br>कामाचा अनुभव) | रु.५३२/- | रु.१५,९७६/- | रु.५०६/- | रु.१५,१८०/- |
| ४) | प्रवर्तक | रु.५३२/- | रु.१५,९७६/- | रु.५०६/- | रु.१५,१८०/- |

तसेच सदर ठेकेदाराने २००८-०९ या वर्षात ११ महिन्यांच्या कालावधीत कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमास वरीलप्रमाणे मनुष्यबळ पुरविल्याचेही पत्रात कळविले आहे. सबब, निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत तातडीने ही सेवा सुरु करणे आवश्यक असल्याने मे.के.आर.सोनावणे ॲन्ड सन्स या ठेकेदारास मा.स्थायी समितीच्या महानगरपालिका अधिनियम ५(२) (२) अन्वये कार्योत्तर मंजूरीच्या अधिन राहून बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणेकामी दि.२३/१०/२०१५ रोजी कार्यादेश दिला आहे. तसेच बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणेकामी महानगरपालिका अधिनियम ५(२) (२) अन्वये स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेस प्रशासनाने शिफारस केली आहे.

तसेच महानगरपालिकेने JnNURM-II या योजने अंतर्गत खरेदी केलेल्या बसेस स्वत: चालविण्याचा निर्णय घेतलेला असल्यामुळे बसेसच्या इंधनासाठी येणारा खर्च, वंगण खर्च, बसेस देखभालीसाठी येणारा खर्च, छपाई खर्च तसेच वरीलप्रमाणे नेमण्यात आलेले ठेक्यावरील कर्मचाऱ्यांचा वेतनाचा येणारा खर्च हे करणेही आवश्यक आहे. परिवहन उपक्रम वर्ष २०१४-१५, सुधारित सन २०१५-१६ सुधारित अंदाजपत्रकात पुढीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

सत्य प्रत

| अनु क्र. | लेखा शिर्ष | अंदाजपत्रकातील तरतूद |
|---|---|---|
| १. | डेपो देखभाल दुरुस्ती (AMC) | रु.२० लक्ष |
| २. | बसेस देखभाल दुरुस्ती (AMC) | रु.१०० लक्ष |
| ३. | छपाई खर्च | रु.२ लक्ष |
| ४. | वाहन देखभाल व दुरुस्ती | तरतूद नाही. |
| ५. | वाहतूक विभाग अधिकारी, कर्मचारी वेतन/ठेक्यावरील कर्मचारी | तरतूद नाही. |
| ६. | इंधन, वंगण, स्पेअर पार्ट खर्च | तरतूद नाही. |

परिवहन उपक्रम अंदाजपत्रकात वरील 'वाहन देखभाल व दुरुस्ती', 'वाहतूक विभाग अधिकारी, कर्मचारी वेतन/ठेक्यावरील कर्मचारी', 'इंधन, वंगण, स्पेअर पार्ट खर्च' हे लेखा शिर्ष असुन त्यामध्ये तरतूद केलेली नाही. सबब, या लेखाशिर्षा अंतर्गत पुढील अंदाजित तरतूद करणे आवश्यक आहे.

| अनु क्र. | लेखा शिर्ष | अंदाजित तरतूद |
|---|---|---|
| १. | डेपो देखभाल दुरुस्ती (AMC) | - |
| २. | बसेस देखभाल दुरुस्ती (AMC) | - |
| ३. | छपाई खर्च | रु.२० लक्ष |
| ४. | वाहन देखभाल व दुरुस्ती | रु. २० लक्ष |
| ५. | वाहतूक विभाग अधिकारी, कर्मचारी वेतन/ठेक्यावरील कर्मचारी | रु.१८० लक्ष |
| ६. | इंधन, वंगण, स्पेअर पार्ट खर्च | रु.३२४ लक्ष |

सबब, JnNURM-II योजने अंतर्गत प्राप्त बसेस चालविणेसाठी दि.२५/१०/२०१५ पासू पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मे.सोनावणे ॲन्ड सन्स प्रा.लि. या ठेकेदाराकडू एच.पी.एम.व्ही बस बॅचधारक व आर.टी.ओ. कडील लायसन्स प्राप्त बस चालक, बस वाहक तिकिट तपासनीस व प्रवर्तक उपलब्ध करुन घेणेस, व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच वरी अनु क्र.१ ते ६ अंतर्गत लेखाशिर्षांतर्गत अंदाजित तरतूद करणेस ही सभा कार्योत्तर मंजुरी दे आहे.

सुचक:- श्री. शरद पाटील

अनुमोदक:- श्री. हरिश्चंद्र आमगा

ठराव सर्वानुमते मंजूर

सत्य प्रत
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मुद्दा क्र.०७

# करारनामा

करारनामा लिहून देणार :-
मे.के.आर सोनावणे ॲन्ड सन्स

करारनामा लिहून घेणार :-
मा.परिवहन व्यवस्थापक
(परिवहन विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका,

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2015 U 965600

DIST TREASURY OFFICE THANE

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे.

28 SEP 2015

|| करारनामा ||

करारनामा लिहून देणार :- मे.के.आर सोनावणे ॲन्ड सन्स,
ऐरोली, नवी मुंबई.

करारनामा लिहून घेणार :- मा.परिवहन व्यवस्थापक
(परिवहन विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे.

कारणे करारनामा लिहून देण्यात येते की,

आम्ही खालील साक्षीदार याद्वारे मा.आयुक्त सो. मिरा भाईंदर महानगरपालिका यांना पुढील प्रमाणे लिहून देत आहे की,

मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्वतः परिवहन सेवा चालविण्याचा निर्णय घेतलेला असुन महापालिकेने आमचेकडून दि.२३/१०/२०१५ रोजीच्या कार्यादेशानुसार ठेका पध्दतीने HPMV

जबाबदारी निविदाकारांची राहील.

बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक या मनुष्यबळाकरिता स्विकारलेला देकार आम्हांस मान्य असुन ह्या अभिलेखाद्वारे सदर देकार आम्ही तत्वतः मान्य करुन ते आम्हास बंधनकारक राहील.

सदर देकारात आम्ही महानगरपालिकेच्या परिवहन विभागाकरिता खालील अटीशर्तींच्या अधिन राहून HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करण्याचे मान्य केले आहे.

**अटी - शर्ती :-**

१. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाकरिता तीन पाळ्यांमध्ये वरील ठिकाणी स्वखर्चाने HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, आम्हांस पुरविणे बंधनकारक राहील.

२. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागात आवश्यकतेनुसार विविध पाळीत HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणे बंधनकारक राहील. मा.सहाय्यक कामगार आयुक्त, ठाणे यांचे कार्यालयाकडील वाहनचालक पुरवठा करणेबाबत परवाना निविदाधारक यांनी कार्यादेश दिल्यानंतर लवकरात लवकर वाहन विभागात जमा करणे बंधनकारक राहील.

३. निविदाकाराने सक्षम HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणे बंधनकारक राहील. आवश्यकतेनुसार HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांची संख्या कमी किंवा अधिक करण्याचा अधिकार मा.आयुक्त सो., परिवहन व्यवस्थापक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहील.

४. अ) ठेका HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांनी दर दिवशी किमान आठ तास काम करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे काही वेळेस अत्यावश्यक बाबी संबंधी आवश्यकता निर्माण झाल्यास सदर HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक जादा तास काम करावे लागेल व त्याचा कोणताही वेगळा मोबदला महानगरपालिकेकडून दिला जाणार नाही. तसेच एखादा HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक (अत्यावश्यक सेवा) हजर न झाल्यास त्याच HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यास पुढील आठ तास काम करणे बंधनकारक राहील.

ब) वाहन पुर्ण स्वच्छ ठेवणे, इंधन उपलब्ध असल्याची खात्री करणे, वाहन सुस्थितीत ठेवणे इत्यादी जबाबदारी संबंधित कंत्राट HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक यांची असेल.

५. HPMV बस बॅचधारक बसचालकाकडून निष्काळजीपणामुळे अपघात झाल्यास वाहनाचे होणारे नुकसान भरपाई संबंधित ठेकेदाराकडून वसुल करण्यात येईल. तसेच HPMV बस बॅचधारक बसचालकामार्फत अपघातामध्ये जिवीतहानी अथवा वित्तहानी झाल्यास त्याची भरपाई, तसेच फौजदारी व न्यायालयीन दाव्याबाबत कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारावर राहील. याबाबत मिरा भाईंदर महानगरपालिका कडून कोणताही मोबदला दिला जाणार नाही याची संपूर्ण जबाबदारी निविदाकारांची राहील.

६. ठेकेदारास महानगरपालिकेने नेमून दिलेल्या वाहनांवर दररोज HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक पुरवठा करणे, तसेच तिकिट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणे बंधनकारक असुन HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक पुरवठा न केल्यास सदर ठेकेदाराच्या मासिक देयकातून सरसकट रु.१००/- प्रति बसचालक व बसवाहक प्रति दिन कपात करण्यात येईल. तसेच एखादा बसचालक व बसवाहक गैरहजर असल्यास त्याऐवजी नविन बसचालक व बसवाहक देणे त्या दिवसाचे वेतन संबंधित बसचालकास व बसवाहकास देणे बंधनकारक राहील.

७. ठेकेदाराने उपस्थित असलेल्या बसचालक व बसवाहक यांचा साप्ताहिक अहवाल विभागप्रमुखाकडून प्रमाणित करुन स्वतः किंवा प्रतिनिधीमार्फत परिवहन विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

८. ठेका HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांना परिवहन विभागप्रमुखाच्या नियंत्रणाखाली व सुचनेप्रमाणे काम करावे लागेल.

९. मंजूर निविदा ठेकेदारास सिक्युरिटी डिपॉझीट रु.१,५०,००० (अक्षरी रुपये एक लक्ष पन्नास हजार मात्र) बॅंक गॅरेन्टी स्वरुपात कार्यादेश दिल्यानंतर लवकरात लवकर जमा करावी लागेल.

१०. किमान वेतन कायदा १९४८ च्या नियमानुसार कंत्राटी HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांना प्रचलित किमान वेतन, विमा, घरभाडे, बोनस इत्यादि भत्ते देण्याची जबाबदारी ठेकेदारास बंधनकारक राहील. कृपया स्पष्ट नोंद घ्यावी.

११. कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट १९७० व १९७१ अन्वये ठेका HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांचा गटविमा, मेडिक्लेम, प्रॉव्हिडंट फंड, बोनस आदी भत्ते उपरोक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना देणे बंधनकारक आहे. प्रत्येक महिन्यात ठेका HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांचे पी.एफ. ची रक्कम त्यांच्या वैयक्तिक खात्यावर जमा करणे हे शासकीय नियमानुसार बंधनकारक असुन ठेकेदाराने मागील महिन्याचे पी.एफ. भरल्याची प्रत्येक चलन प्रत देयकासोबत जोडणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पुढील देयक अदा केले जाणार नाही.

१२. प्रचलित शासकीय नियम पाळणे, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ठेकेदारावर बंधनकारक राहील. तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने ठेकेदाराने संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

१३. निविदेतील अटीशर्ती बाबत काही वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेवर तो सोपविण्यात येईल. मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका दोन्ही पक्षाकरिता लवाद असतील व त्यांच निर्णय अंतिम व दोन्ही पक्षावर बंधनकारक राहील.

१४. एखाद्या HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक विषयी तक्रार असल्यास सदर कंत्राटी कर्मचाऱ्या ऐवजी दुसरा योग्य तो कंत्राटी कर्मचारी विनाविलंब पुरविणेची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१५. ठेकेदाराने समाधानकारक काम केल्याचे प्रमाणपत्र परिवहन विभागप्रमुख यांच्याकडून दरमहा प्रमाणित केल्याशिवाय देयक अदा करण्यात येणार नाही.

१६. ठेकेदाराचे कामाबाबत अनियमितता, तक्रारी, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास तसेच ठेकेदारांनी ठेक्यातील अटीशर्तींचे उल्लंघन केल्यास २ दिवसांची लेखी नोटीस देऊन त्यांचे कंत्राट रद्द करण्यात येईल व नियमाप्रमाणे महानगरपालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल

१७. ठेकेदाराने HPMV बस बॅचधारक बसचालक, बसवाहक, तिकिट तपासनीस व प्रवर्तक यांना गणवेश देणे, स्वतःच्या संस्थेच्या नावाचे ओळखपत्र देणे बंधनकारक आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

१८. सदर ठेक्याचा कालावधी परिवहन विभागाची पुढील निविदा प्रक्रिया होईपर्यंत राहील.

१९. सदरचे कामाचे योग्य देयक आम्ही प्रत्येक महिन्याच्या शेवटी महानगरपालिकेस सादर करुन ते देयक महानगरपालिकेस मिळाले तारखेपासून १५ दिवसांच्या आत पुर्ण करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

२०. वरील सर्व अटी-शर्तीत काही असेल तर महानगरपालिकेच्या हिताच्या विरुध्द कोणतेही वर्तन आमच्याकडून घडणार नाही व तसे झाल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नुकसानीची जबाबदारी आमच्यावर राहील.

२१. वरील करारनामा व त्यातील अटी-शर्ती आम्ही वाचून समजून घेतल्या तसेच दोन्ही पक्षकारास मान्य आहेत.

| करारनामा लिहून देणार | करारनामा लिहून घेणार |
|---|---|
| मे.के.आर.सोनावणे ॲन्ड सन्स | परिवहन व्यवस्थापक<br>मिरा भाईंदर महानगरपालिका |
| (श्री. नरेश पाटील)<br>स्थायी समिती सदस्य | (Suhas Rakshe)<br>(स्थायी समिती सदस्य) |